# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### विदर्भातील अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या मुलींचा शोध घेण्याबाबत

**(१) ३३९३ (३०-०५-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर या ६ जिल्ह्यातून ९२६ मुली बेपत्ता झाल्याचे दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेपत्ता मुलींचा शोध घेण्यात आला आहे काय, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेपत्ता झालेल्या मुलींचा शोध घेऊन अपहरणकर्त्याला अटक करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) व (२) विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती व नागपूर या सहा जिल्ह्यामध्ये २०२० मध्ये माहे मे, २०२० अखेर भादंवि कलम ३६३ अन्वये ३४४ मुली बेपत्ता झाल्याबाबत गुन्हे दाखल असून त्यापैकी २४१ मुली मिळून आल्या आहेत. सदर गुन्हयातील १२३ आरोपींना अटक करण्यात आली असून ९६ आरोपीविरुध्द दोषारोप पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात विशेषत: जालना जिल्ह्यातील मेंढपाल बांधवावरील हल्ले रोखण्यासंदर्भात

**(२) ५०६८ (१२-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निपाणी चिंचोळी (ता.भोकरदर, जि.जालना) गावात व्यवसायाने मेंढपाळ असलेले चुलता व पुतण्या यांच्यावर मेंढ्या, बकऱ्या चारण्यासाठी शेतात घुसल्याच्या कारणावरुन झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात श्री.रामदास कडुबा जोशी यांचा मृत्यू झाला असून पुतण्या श्री.योगेश जोशी जखमी झाल्याची घटना घडल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणामुळे मेंढपाळ बांधवांना संरक्षण देण्यासंदर्भात राज्यातील धनगर समाज व अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आरोपीवर कारवाई करुन मेंढपाल बांधवांवरील हल्ले रोखण्यासंदर्भात तसेच त्यांना संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन ०७ आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द गु.र.नं.१९२/२०२० अन्वये भां.द.वि कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मेंढपाळ बांधवांवरील हल्ले रोखण्याच्या अनुषंगाने त्यांनी याबाबतची तक्रार केल्यास तात्काळ दखल घेण्याबाबतच्या सूचना स्थानिक जिल्हा प्रशासनातर्फे पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित गावातील प्रतिष्ठीत नागरिकांच्या बैठका घेऊन गावात शांतता राखण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मेंढपाळ बांधवांनी पोलीस संरक्षणाची मागणी केल्यास त्यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्याच्या सूचना पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील कुंभार घाटाची भिंत कोसळून अपघात झाल्याबाबत

**(३) ५२६५ (१८-११-२०२०) श्री.महादेव जानकर, श्री.नरेंद्र दराडे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील कुंभार घाटाची भिंत कोसळून झालेल्या अपघातात कोळी समाजातील एकाच कुटुंबातील चार सदस्यासह अनेकजणांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभिररित्या जखमी झाल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रभागा नदीच्या घाटाचे निकृष्ट दर्जाचे बांधकामामुळे अपघात झाला असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केली असून चंद्रभागा नदी घाटाचे बांधकाम करणारे ठेकेदार व दोषी अधिकारी यांचेवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघातग्रस्तांचे पुनर्वसन करुन त्यांना शासकीय नोकरीमध्ये प्राधान्य देणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदारावर गुन्हा दाखल करुन ठेकेदार व दोषी अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच अपघातात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना, जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

भिमा नदीच्या काठावरील कुंभार घाटाची भिंत दिनांक १४/१०/२०२० रोजी कोसळून ०६ व्यक्तींचा मृत्यू झाला असून मृत व्यक्तींपैकी ०४ व्यक्ती एकाच कुटुंबातील कोळी समाजाच्या आहेत. सदर घटनेत इतर कोणीही जखमी झालेले नाही.
(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं.६९१/२०२०, भा.दं.वि. कलम ३०४(अ), ४२७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) सदर कामाच्या ठेकेदारावर घाट बांधकाम सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणाऱ्या उपाययोजना केल्या नसल्याने दिनांक १४/१०/२०२० रोजी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सदर घटनेत मृत्यू पावलेल्या एकूण ६ मयतांपैकी ओळख पटलेल्या ४ मयतांच्या वारसांना प्रत्येकी ४.०० लाख रुपये मदत वितरीत करण्यात आली आहे.

अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या नातेवाईक अथवा वारसदारांचा शासकीय नोकरी मिळण्याबाबत कोणताही अर्ज संबंधित विभागाकडे प्राप्त झालेला नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

## नागपूर शहरातील उंटखाना परिसरातील दहिपुरा ले-आऊट मध्ये कार पेटवून दिल्याबाबत

**(४) ७८७८ (११-०२-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील उंटखाना परिसरातील दहिपुरा ले-आऊट मध्ये ३ कार पेटवून दिल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) होय.
(२) पोलीस स्टेशन, इमामवाडा नागपूर शहर येथे दिनांक ०३/०१/२०२१ रोजी अप.क्र. ०४/२१ कलम ४३५, ४२७, ३४ भा.दं.वि. सह कलम ८ (क) २७ एनडीपीएस ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयात २ आरोपीस अटक करुन त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ओमशांती गृहनिर्माण सहकारी संस्था, नागपूर या संस्थेच्या मौजा चिचभवन येथील ले-आऊटच्या गैरप्रकाराची चौकशी होण्याबाबत

**(५) ८८३५ (१३-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ५९२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओमशांती गृहनिर्माण सहकारी संस्था, जि.नागपूर या संस्थेच्या मौजा चिचभवन येथील ले-आऊट संस्थेने एक प्लॉट दोन व्यक्तींना विकून प्लॉट भूखंड धारकांची फसवणूक केल्याप्रकरणी नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ११ मे, २०२०, ३१ ऑगस्ट, २०२० व २० जानेवारी, २०२१ रोजी निवेदन पाठवून संबंधिताची चौकशी करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनीष बळीराम सहारे, रा.नागपूर यांनी सोनेगांव पोलीस स्टेशन, नागपूर येथे तक्रार करुनही संबंधिताविरूध्द गुन्हे दाखल केले नाही, तसेच याप्रकरणी वारंवार निवेदने/तक्रारी देवूनही शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरप्रकार व भूखंड धारकांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.मनीष बळीराम सहारे, रा. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारी बाबत पोलीस स्टेशन, सोनेगांव येथे यापूर्वी दिनांक १९/०७/२०१७ रोजी अन्य एका फिर्यादीच्या तक्रारीवरुन अपराध क्र. २३०/१७, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भा. दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने तक्रारदार मनीष बळीराम सहारे यांची तक्रार मौजा चिचभवन मधील प्लॉट नं. ६७ याच ले-आऊट मधील असल्याने त्यांची तक्रार उक्त गुन्हयात समाविष्ट करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्हयांच्या तपासात दोन आरोपींनी फौजदारी कट रचून, खोटे विक्री पत्र तयार करुन फिर्यादी, इतर प्लॉट धारक, गुन्हयातील साक्षीदार यांचे अर्थिक नुकसान करुन फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयातील आरोपी मयत झाले असल्याने दिनांक ०२/०२/२०१८ रोजी ॲबीटेड समरी क्र. ०१/२०१८ मा.अतिरीक्त मुख्य न्यादंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल केली आहे. मा प्रथम न्यादंडाधिकारी कोर्ट नं. ८ यांनी दिनांक ३०/०१/२०२१ रोजी सदर ॲबीटेड समरी मंजूर केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे साप्ती (ता.हतगाव, जि.नांदेड) येथील कुटुंबाच्या राहत्या घरी चोरट्याने शिरुन लाखो रुपयाचा ऐवज लंपास केल्याबाबत

**(६) ११२८४ (०५-०१-२०२२) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साप्ती (ता.हतगाव, जि.नांदेड) येथे सोयाबीन काढणीसाठी केलेल्या कुटुंबाच्या राहत्या घरी चोरट्याने शिरुन लाखो रुपयाचा ऐवज चोरून नेल्याची घटना दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरोपींना अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) साप्ती, जि.नांदेड येथील संबंधित शेतकरी हे दिनांक ०९/०९/२०२१ रोजी शेतात गेले असता घरातून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण रुपये १,३२,०००/- इतक्या रकमेचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन हदगाव, जि.नांदेड येथे गु.र.नं.२८०/२०२१, भा.दं.वि. कलम ४५४, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास करण्यात येत आहे.
तसेच सदर गुन्ह्यात तुर्तास “अ” समरी मंजुरीसाठी दिनांक ३१/०३/२०२२ रोजी मा.न्याय दंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय, हदगाव, जि.नांदेड येथे दाखल करण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## नांदेड शहरातील उस्मानीशाही नाला शुध्दीकरणाच्या कामावरील हजारो रुपयांच्या सामुग्री चोरटयानी लंपास केल्याबाबत

**(७) ११२९३ (०५-०१-२०२२) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरातील उस्मानीशाही नाला शुध्दीकरणाच्या कामावर ठेवलेले स्टील गजाळी, लोखंडी दरवाजे,पत्रे असे हजारो रुपयांची सामुग्री अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाणे, नांदेड येथे गु.र.नं.३६४/२०२१, भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील वाहन चोरीच्या घटना रोखण्याबाबत

**(८) १२२८३ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात वाहन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून वाकड, चिखली, चाकण, पिंपरी (जि.पुणे) भागात वाहन चोरट्यांनी शहर व परिसरातून सात दुचाकी वाहने चोरी केल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी वाहनाची चोरी, सोन्याची साखळी,सायलेन्सरची चोरी, एका कंपनीचे ५७ हजार रुपये किंमतीचे ५७० जॉब चोरटयाने चोरुन नेल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन चोरीच्या घटना रोखण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) व (२) होय.
(३) वाहन चोरीच्या घटना रोखण्याचे दृष्टीने तपासाअंती वाहन चोरीच्या एकूण ५८ गुन्हयामध्ये आरोपींना अटक करण्यात आली असून, कारागृहातून सुटलेल्या आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच कंपनीच्या जॉब चोरीच्या गुन्हयाबाबत भोसरी पोलीस स्टेशन येथे गुरनं. ३६/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयातील आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे चोरीचे गुन्ह्यांना आळा बसावा याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही/ उपायायोजना केली जात आहे :

१. कारागृहातून सुटलेले तसेच रेकॉर्डवरील चोरी करणारे सर्व आरोपीस गुन्हे शाखा तसेच पोलीस ठाण्यांकडील तपास पथके यांचे मार्फतीने वेळोवेळी चेक करुन त्यांचेवर योग्य ती प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
२. पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतुन बाहेर पडणारे मार्गावर सरप्राईज नाकाबंदी करून वाहने चेक केली जातात. यामध्ये संशयित वाहने अथवा व्यक्ती आढळुन आल्यास त्याचेवर कारवाई केली जात आहे.
३. चोरीचे गुन्ह्यांची क्राईम मॅपिंग करुन गुन्हे घडण्याची ठिकाणे, ठराविक वेळा गुन्ह्याची पध्दत इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास करुन गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने संशयितांवर नजर ठेवली जाते.
४. रेकॉर्डवरील चोरी करणारे सर्व आरोपींचा अभ्यास करून गुन्हा करण्याचे पध्दतीनुसार संशयित असलेल्या आरोपींना चेक केले जात आहे.
५. चोरीचा माल विकत घेणाऱ्यांना भा.दं.वि.कलम ४११ अन्वये सहआरोपी करून गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.
६. चोरीचे घटनांना आळा घालणे करीता अधिकाधिक पार्कींगचे परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे दृष्टीने सोसायट्या, खाजगी व शासकीय संस्था, औदयोगिक वा आयटी क्षेत्रातील कंपन्यां यांना प्रेरीत केले जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील शासकीय उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड येथील बालरोग तज्ञांची गोळीबार करुन हत्या केल्याबाबत

**(९) १२७७२ (३०-०३-२०२२) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील नमस्कार चौक येथील रहिवाशी व राजाराम प्रभाजी उतरकर शासकीय उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड येथे कार्यरत असलेले बालरोग तज्ञ डॉ.हनुमंत धर्मकारे यांच्यावर पुसद रोडवर गोळीबार करुन हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोळीबार करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-११-२०२२) :** (१) व (२) राजाराम प्रभाजी उत्तरकर शासकीय उप जिल्हा रुग्णालय, उमरखेड येथे कार्यरत असलेले वैद्यकिय अधिकारी, डॉ. हनुमंत धर्मकारे यांची दिनांक ११/०१/२०२२ रोजी पुसद रोडवर गोळी घालून हत्या केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन उमरखेड येथे गु.र.नं.१८/२०२२, भा.दं.वि. कलम ३०२, १२०(ब), १०९, २१२, २०१ सह, शस्त्र अधिनियम, १९५९, कलम ३/२५, ३/२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण ०८ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ६ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित २ आरोपी फरार आहेत.

सदर गुन्ह्यात आरोपींविरुध्द दिनांक १५/०३/२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## जालना जिल्ह्यात ऑनलाईन फसवणूकीच्या गुन्हयांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१०) १२९०५ (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात ऑनलाईन फसवणूकीच्या गुन्हयांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यात एनी डेस्क, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून गेल्या दोन महिन्यात ऑनलाईन पध्दतीने ८ लाख रुपयांची १२ जणांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) जालना जिल्ह्यात जानेवारी २०२२ अखेर एनी डेस्क, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून फसवणुक झाल्याबाबत एकूण ५ गुन्हे नोंदविण्यात आले असून एकूण ५ इसमांची रुपये ४,७९,८०७/- इतक्या रकमेची फसवणुक झाली आहे. सदर गुन्हे सायबर पोलीस स्टेशनला वर्ग करण्यात आले असून तपासावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सेवानिवृत्त पोलिसांच्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्याबाबत

**(११) १३३९० (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांना फंडाचे पैसे, तसेच ग्रॅच्युटी रक्कम मिळण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागत असल्याची बाब दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, शासनास परत केलेल्या शिल्लक १० महिने सुट्टीचा पगार आणि विकलेल्या निवृत्तीवेतन व गट विमा योजनेचा मोबदला देखील वेळेत मिळत नाही, हे हि खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि राज्यातील सेवानिवृत्त पोलिसांच्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत वा घेण्यात येत आहेत;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना फंडाचे पैसे सेवानिवृत्ती दिनांकानंतर त्वरित अदा केले जातात. सेवानिवृत्त झाल्यानंतर निवृत्तीधारकाचे सेवापुस्तकाची पडताळणी होण्यास विलंब होत असल्यास निवृत्ती वेतन धारकाने मागणी केल्यास त्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन व तात्पुरते सेवा उपदान रक्कम अदा केले जाते.
(२) ज्या सेवानिवृत्त निवृत्ती वेतनधारकांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झाली आहे. अशा कर्मचाऱ्यांना शिल्लक रजेची रोख सममूल्य वेतन व गट विमा योजनेची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(३) सातव्या वेतन आयोगाचे निवृत्ती वेतन विनाविलंब अदा करण्याबाबत शासनाने महालेखापाल कार्यालयाकडून सेवानिवृत्तीवेतन करण्यासंदर्भात दिनांक १२/०५/२०२० दिनांक २५/०६/२०२० व दिनांक ०७/०५/२०२१ हे शासन निर्णय वेळोवेळी निर्गमित केली आहेत.

सेवानिवृत्तीची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहिल्यामुळे व वेतन पडताळणी पथकावरील कामाच्या अतिरिक्त ताणामुळे पोलीस आयुक्त कार्यालयातील लेखा अधिकारी यांना शासनाने दिनांक २५/११/२०२० रोजी पोलीस आयुक्त बृहन्मुंबई कार्यालयातील दोन लेखा अधिकारी यांना वेतन पडताळणी पथके स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे व दिनांक ८ जून, २०२१ व दिनांक २५/११/२०२० रोजीच्या शासन आदेशान्वये ३१/१२/२०२१ पर्यंत वेतन पडताळणी पथकांना दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून सध्या त्यांच्या मार्फत वेतन पडताळणीचे काम जलद गतीने सुरु असून दिनांक २१/०४/२०२२ पर्यंत ५६९७ सेवापुस्तकाची वेतन पडताळणी झाली आहे.
(४) लॉकडाऊन काळात शासकीय कर्मचाऱ्यांच्या कमी उपस्थितीमुळे वेतन पडताळणी पथकास सादर केलेल्या सेवापुस्तकांची पडताळणी वेळेवर होऊ शकली नाही. तसेच महालेखापाल कार्यालयास सादर केलेली प्रकरणेही मंजूर होण्यास विलंब होत होता. तथापि, आता पोलीस आयुक्त कार्यालयांतर्गत दोन वेतन पडताळणी पथके स्थापन करण्यात आली असून त्यांच्या मार्फत वेतन पडताळणीचे काम जलद गतीने सुरू आहे.

---

## राज्यातील शेतकरी अतिवृष्टी, ढगफुटी, गारपीटग्रस्त असताना व शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्याबाबत

**(१२) १३४१८ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकरी अतिवृष्टी, ढगफुटी, गारपीटग्रस्त असताना व शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्याने रासायनिक खतांची केलेली भरमसाठ दरवाढ तात्काळ मागे घेण्यात यावी अशी मागणी शेतकरी व विविध संघटनांनी शासनाकडे केली असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, राज्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीमुळे त्रस्त असून शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाल्याने आत्महत्या करीत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१०-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विविध निविष्ठांची प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारित किंमती, केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात. केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोग, विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्याआधारे केंद्र शासन शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

राज्यात सन २०२१-२२ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेती / फळपिकांचे क्षेत्रास शासनाने वेळोवळी निधी वितरीत केलेला आहे. तसेच, रासायनिक खतांच्या वाढलेल्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने केंद्र शासनास कळविले आहे. त्यानुसार, केंद्रीय खत विभागाने सन २०२१-२२ व सन २०२२-२३ करीता खरीप व रब्बी हंगामासाठी खतांवरील अनुदानाच्या दरामध्ये वाढ केल्यामुळे खतांच्या वाढीव किंमती पासून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर, जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२०२१ या वर्षात आरओ प्लान्ट लावण्यासाठी खर्च करण्यात आलेल्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१३) १३६२५ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद, नागपूर येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२०२१ या वर्षात ०२.२७ कोटी रूपये आरओ प्लान्ट लावण्यासाठी खर्च करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणी संबंधित पंचायत समितींची मंजुरी न घेता व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना डावलून जिल्हा परिषद, नागपूर येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी परस्पर कंत्राटदारांना देयके अदा करुन निधी खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०२-११-२०२२) :** (१) हे खरे नाही. ठक्कर बाप्पा वस्ती सुधारणा योजनेंतर्गत सन २०२०-२१ मध्ये जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या दिनांक ३०/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये रुपये २२७.५० लक्षच्या २५ कामांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी १६ कामे जलशुद्धीकरण यंत्रांची असून त्यांची किंमत प्रतिकाम ७.५० लक्ष अशी एकूण रक्कम रुपये १२०.०० लक्ष होते. तर उर्वरित रुपये ६७.५ लक्षची ९ कामे बांधकामाबाबत असून रुपये ४०.०० लक्ष अन्य कामांसाठीची तरतूद आहे. तर जलशुद्धीकरण यंत्रांच्या १६ कामांपैकी ८ कामांवर रुपये ६०.०० लक्ष खर्च झालेला आहे.
(२) ठक्कर बाप्पा वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव/लोकप्रतिनिधींच्या शिफारशींनुसार कामांची निवड होते. तद्नंतर जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. प्रशासकीय मान्यतेनुसार संबंधित यंत्रणेकडून कामे करून घेण्यात येतात. सदरची कामे जलशुद्धीकरण संयंत्राची असल्याने ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद नागपूर मार्फत करून घेण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित पंचायत समिती व पदाधिकाऱ्यांच्या मान्यतेचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी बांधवांच्या जमिनी प्रशासकीय स्तरावर बिगर आदिवासींच्या नावे होत असल्याबाबत

**(१४) १३७७१ (२५-०८-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी बांधवांच्या जमिनी प्रशासकीय स्तरावर संगनमत करुन बिगर आदिवासींच्या नावावर करण्यात आल्या असल्याचे माहे मार्च, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीनी मूळ आदिवासी बांधवांच्या नावावर होण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील सर्वसामान्य गरीब आदिवासी बांधवांना न्याय मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेसा कायद्यांतर्गत बिगर आदिवासींच्या नावावर झालेल्या जमीनी मूळ आदिवासींच्या नावावर करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन आदिवासी बांधवांना पेसा कायद्यांतर्गत न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-११-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय. हे खरे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ३६ व ३६- अ मधील तरतूदी व महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ मधील तरतूदींमध्ये नमूद केल्यानुसार, आदिवासी व्यक्तींच्या जमिनी ह्या आदिवासी व्यक्तींनाच हस्तांतरीत करण्यात येतात. तथापि, सदर अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्यामार्फत शासनाच्या पूर्वमान्यतेसाठी आदिवासी खातेदारांची जमीन बिगर आदिवासी खरेदीदाराकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्राप्त प्रस्ताव गुणवत्तेवर तपासून शासन स्तरावर उचित निर्णय घेतला जातो. अशी परवानगी देताना प्रकरणी खरेखुरे अकृषिक प्रयोजन सिध्द होत असल्याबाबत आणि त्या जमिनीवर प्रस्तावित अकृषिक वापर अनुज्ञेय असल्याबाबत खात्री करण्यात येते. संबंधित जमिनीची विक्री करणारा आदिवासी व्यक्ती भूमीहिन होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. तसेच आदिवासी खातेदारास असलेली आर्थिक निकड व सदर जमिनीच्या अकृषिक दराने आदिवासी खातेदार यांना योग्य मोबदला मिळत असल्याबाबतची खातरजमा केली जाते.

अनाधिकाराने आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासी व्यक्तींना होत असल्यास व मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्यास शासन पत्र दिनांक १५/१२/२०२१ अन्वये सर्व विभागीय आयुक्तांना सूचना देण्यात आल्या आहेत की अनाधिकाराने हस्तांतरण झालेल्या आदिवासींच्या जमिनींचे पुन्हा आदिवासींकडे हस्तांतरण करण्यात यावे व सदर हस्तांतरणबाबतची प्रक्रिया जलद विहित कालमर्यादेत करण्यात यावी.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनेक तरुणांची मेरीट ब्लू इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी संस्थेने फसवणूक केल्याबाबत

**(१५) १४०५० (३०-०६-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक तरुणांची मेरीट ब्लू इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी संस्थेने सोशल मिडीयावर जाहिरात करुन नामांकित महाविद्यालयामध्ये वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार ठाणे येथे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून पूणे, चिपळूण, अकोला व जळगावसह १५ ते २० तक्रारदारांची रुपये ५० लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाण्यातील तक्रारदार हे श्रीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास गेले असता तेथील अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मेरीट ब्लू इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खाजगी संस्थेवर तसेच, तक्रार दाखल करुन न घेणाऱ्या श्रीनगर पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२२) :** (१) सदर प्रकरणी पुणे येथील एका तक्रारदाराची व ठाणे येथील ६ तक्रारदारांची एकूण रुपये २९,५९,९००/- इतक्या रकमेची फसवणूक झाली आहे. चिपळूण, अकोला व जळगांव येथे याबाबत कोणत्याही तक्रारी दाखल नाहीत.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील श्रीनगर पोलीस ठाणे येथे गुर नं १०१/२०२२, भादंवि कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुर नं ८३/२०२२ भादंवि कलम ४१९, ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधि. कलम ६६सी, ६६डी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास सुरु आहे.

तसेच सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील श्रीनगर पोलीस ठाणे येथे गुर नं १०१/२०२२, भादंवि कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात तीन आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विशेष घटक योजना, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत राष्ट्रीय कृषि विकास योजना मध्ये मयत आदिवासी लाभार्थ्यांच्या वारसास विहीरीचा लाभ देण्याबाबत

**(१६) १४०७० (२५-०८-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशेष घटक योजना, कृषि विभाग,महाराष्ट्र शासन अंतर्गत राष्ट्रीय कृषि विकास योजना मध्ये लाभार्थ्यांना जल सिंचन विहीर दिली जाते परंतु सदर विजेता लाभार्थी जर मयत झाला तर त्याची वारस नोंद घेतली जात नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास,त्याच्या वारसास लाभ मिळणे आवश्यक असताना विजेता जर मयत झाला तर त्याच्या वारसास लाभ न देता सदरील जलसिंचन विहिर रद्द केली जाते हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास,गहुखेल (ता.आष्टी, जि.बीड) येथील आदिवासी लाभार्थी शिवाजी बबन जगताप यांना राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत विहीर मंजूर झाली असताना व कागदपत्रे अपलोड केली असताना सुद्धा त्यांच्या वारसास लाभ न देता सदरील जलसिंचन विहीर पंचायत समिती आष्टीचे कृषि अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी कसलीही खातरजमा न करता, लाभार्थी कुटुंबास विश्वासात न घेता,लाभार्थी यांच्याकडे पंचनामा न करता कसलीही नोटीस न पाठवता रद्द केली आहे हे खरे आहे काय,.
(४) असल्यास,शासनाच्या प्रत्येक योजनेत वारसास लाभ देणे असताना या ठिकाणी मात्र संबंधितांनी लाभार्थी यांच्यावर अन्याय केला आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन सबंधित मयत आदिवासी लाभार्थ्याच्या वारसास विहीरीचा लाभ देण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

सदर योजना अंतर्गत लाभार्थी मयत झाल्यास त्याची निवड जिल्हा स्तरीय निवड समिती मार्फत रद्द करण्यात येते. तथापि, मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसाची निवड जिल्हा स्तरीय निवड समिती मार्फत करण्यात येऊन उर्वरीत अर्थसहाय्य त्यांना देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.
(३) हे खरे नाही.

गहुखेल ता.आष्टी जि.बीड येथील शिवाजी बबन जगताप यांची सन २०२१-२२ मध्ये बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेंतर्गत नविन विहीर या घटकाचा लाभ देण्यासाठी निवड करण्यात आली. निवड झालेनंतर स्थळ पाहणी करीता संबंधित अधिकारी गेले असता, सदर लाभार्थी मयत असल्याचे आढळून आले. त्यामुळे योजनेचा शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांनुसार सदर लाभार्थ्याची निवड रद्द करण्यात आली. लाभार्थी काम चालु होण्यापुर्वी मयत झाल्याने संबंधित लाभार्थीच्या वारसास नियमाप्रमाणे वारस नोंद करुन ७/१२ व ८/अ वारसाच्या नावे नोंद केल्यानंतर नवीन अर्ज करणेबाबत सुचना देण्यात आल्या. यानंतर नियमाप्रमाणे लाभ देण्यात येईल याबाबतही संबंधितास अवगत करण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात खरीप हंगामाकरीता डी.ए.पी खत बॅग सोबत इतर खत घेण्याची सक्ती केल्याबाबत

**(१७) १४०७६ (३०-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात खरीप हंगामा करीता रासायनिक खते उपलब्ध झाली असून खते खरेदी करीता शेतकरी कृषि केंद्रात गेले असता त्यांना डी.ए.पी खत बॅग सोबत इतर खत घेण्याची सक्ती केल्या जात असल्याचा प्रकार दिनांक २३/५/२०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती सदर शेतकऱ्यांवर सक्ती करणाऱ्या कृषि केंद्रावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) :** (१) व २) राज्यात हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना डी.ए.पी. खत बॅग सोबत इतर खत घेण्याची सक्ती वा डी.ए.पी. खताचे ज्यादा दर सांगितल्या बाबत ४ रासायनिक खत विक्रेते यांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. तसेच अमरावती विभागामध्ये अकोला व बुलढाणा जिल्ह्यात एक परवाना निलंबित व अकोला जिल्ह्यामध्ये एक खत विक्री परवाना रद्द करण्यात आलेला आहे.

नागपूर विभागात वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली येथे डी. ए.पी. खत बॅग सोबत इतर खत घेण्याची सक्ती केली जात असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. राज्यात खरीप हंगाम २०२२ सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना दर्जेदार कृषि निविष्ठा मिळण्याकरीता एकूण ३९६ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे राज्यस्तरावर एकूण ४५ तक्रार निवारण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. १ एप्रिल २०२२ ते माहे जुलै २०२२ अखेर ६७२४ नमुने काढण्यात आले आहेत. त्यापैकी ४८८ अप्रमाणित नमुन्यापैकी २५१ न्यायालयीन दावे पात्र नमुने आहेत. त्यापैकी ०४ मध्ये न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत व उर्वरीत न्यायालयीन प्रकरणात पात्र नमुन्यावर दावे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रयोगशील शेतकऱ्यांना राज्यसरकारमार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्याबाबत

**(१८) १४५६० (२५-०८-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षांचे प्रयोगशील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरस्कारांची घोषणा न झाल्यामुळे राज्यातील अनेक शेतकरी या पुरस्कारांपासून वंचित राहिले आहेत, हेही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रयोगशील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सन २०२० करीता विविध कृषि पुरस्कारांसाठीचे एकूण १८३ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही कृषि आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. सन २०२१ करीता विविध कृषि पुरस्कारांचे प्रस्ताव मागविण्याच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालयाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सन २०२२ करीता विविध कृषि पुरस्कारांसाठी कार्यवाही अद्याप सुरु केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यात २२ नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१९) १४७९५ (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात निवासी निवडणूक संजय गांधी निराधार योजना व महसूल नायब तहसिलदार अशी २२ नायब तहसिलदारांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही पदे केव्हापासून रिक्त आहेत व त्यांची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पदे भरणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदरची पदे सेवानिवृत्ती/नियत कालावधीतील बदलीने रिक्त झालेली आहेत.
(३) पुणे विभागातील मंडळ अधिकारी/अव्वल कारकून संवर्गातून नायब तहसिलदार पदावरील पदोन्नतीच्या प्रस्तावामध्ये नजिकच्या काळात सांगली जिल्ह्यातील पदे भरण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड केलेल्या नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांचे वनामती, नागपूर येथे प्रशिक्षण चालू आहे. सदर अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर पदे भरण्याचे प्रस्तावीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कसबेडिग्रज (ता.मिरज, जि.सांगली) येथील महात्मा फुले कृषि विद्यापिठांशी संलग्न असलेल्या कृषि संशोधन केंद्राचा शेतकऱ्यांना होत नसलेला उपयोग

**(२०) १४८१० (२५-०८-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसबेडिग्रज (ता.मिरज, जि.सांगली) येथील महात्मा फुले कृषि विद्यापिठांशी संलग्न असलेल्या कृषि संशोधन केंद्राचा जिल्ह्यातील शेतीला आणि शेतकऱ्यांना शेतीसाठी नवे संशोधन प्रयोग व शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या संशोधन केंद्राचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१७-११-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाशी संलग्न असलेले कृषि संशोधन केंद्र, कसबेडिग्रज येथे प्रामुख्याने सोयाबीन, भुईमूग, हळद व क्षारपड जमीन सुधारणा याबाबत संशोधन केले जाते. सोयाबीन पीकाचे फुले संगम, फुले किमया, फुले अग्रणी, फुले कल्याणी, फुले दुर्वा हे ५ वाण तसेच भुईमुग पिकांचे फुले वारणा, फुले मोरणा व फुले चैतन्य वाण प्रसारित करण्यात आले आहे. सदर वाण हे स्थानिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील शेतकऱ्यांमध्ये प्रसिध्द असून त्याच्या लागवडीविषयीचे मार्गदर्शन कसबेडिग्रज येथील कृषि संशोधन केंद्रामार्फत केले जात आहे. त्याचप्रमाणे सदर संशोधन केंद्रामार्फत हळद पिकाचे कृष्णा व फुले स्वरुपा हे वाण विकसीत केले असून या वाणाचे बियाणे शेतकऱ्यांना केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येते.

सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीखोऱ्यात क्षारपड जमिनीची समस्या मोठ्या प्रमाणात असून क्षारपड जमीन सुधारणा तंत्रज्ञान कसबेडिग्रज येथून प्रसारित केले असून त्याचा शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अवलंब केला जात आहे. त्यासाठी आवश्यक असणारे तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले जाते.

सन-२०२१-२२ या वर्षी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) मार्फत शेतकऱ्यांच्या शेतावरील सोयाबीन फुले संगम व फुले किमया वाणांचा एकूण ८६७५ हे. क्षेत्रावर प्रमाणित बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठामार्फत निर्माण केलेले सुधारित बियाणे, कलमे, जैवीक किटकनाशके, जैवीक खते इ. संशोधन केंद्रावर शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध असून सन-२०२१-२२ या वर्षात ४१७३० आंबा, डाळींब व नारळ पिकाची कलमे, १५५०० ऊसाची कांडे बियाणे व ८८६० किलो जैवीक किटकनाशके या संशोधन केंद्रमार्फत उपलब्ध करुन दिली आहेत. कृषि संशोधन केंद्र, कसबेडिग्रज मार्फत स्थानिक परिसरातील ३० शेतकऱ्यांचा शास्त्रज्ञ मंच स्थापन केला असून या शेतकरी शास्त्रज्ञ मंचामार्फत विद्यापीठ तंत्रज्ञान, प्रात्यक्षिके, गट चर्चा, शेतकरी मेळावा, शिवारफेरी इ. मार्फत शेतकऱ्यांमध्ये प्रसार करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.